# --: प्रेसनोट (दि.20.07.2009) :--

**घटक क्र. 2, गुन्हे शाखा भिवंडी :--**

मोटार वाहन चोरीच्या गुन्हयात वाढ झाल्याने गुन्हे शाखेच्या सर्व घटकांना याकडे विशेष लक्ष देण्यास सांगण्यात आले होते. याचाच एक भाग म्हणुन जुन्या गाडया विकणारे विक्रेते/गाडया दुरुस्त करणारे गॅरेजस् यांच्याकडे विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले होते. यातुनच **सहा.पोलीस निरीक्षक, श्री.संजय निकुंबे,** घटक क्र. 2, गुन्हे शाखा भिवंडी यांना माहिती प्राप्त झाली. मिळालेल्या माहितीवरुन अंबाडी नाका, वाडा रोड, भिवंडी या ठिकाणी असलेल्या एका गॅरेजवर छापा घालण्यात आला. त्यात **मिथुन विठ्ठल पाटील,** वय 23, रा. किरवली, भिवंडी यास ताब्यात घेण्यात आले.

मिथुन पाटील याच्याकडे केलेल्या चौकशीमध्ये सकृत दर्शनी मोटार सायकल चोरीच्या गुन्हयात त्याचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्याला **दिनांक 15/07/2009 रोजी पोलीस ठाणे नारपोली , गु.र.नं.09/09, 379** या गुन्हयात अटक करण्यात आली. आरोपी मिथुन पाटील याच्याकडे केलेल्या सखोल चौकशी अंती त्याच्या इतर 5 साथीदारांची नावे निष्पन्न झाली असुन त्यांना देखील अटक करण्यात आलेली आहे.

(1) **संदीप गजानन पाटील,** वय 25, किरवली, भिवंडी
(2) **नागेश लक्ष्मण कांबळे,** वय 19, रा. राहुगांव, भिवंडी
(3) **राकेश कांतीलाल शेलार,** वय 22, खालीगंगाव, भिवंडी
(4) **मंगेश तुकाराम ठाकरे,** वय 24, खालीगंगाव, भिवंडी
(5) **योगेश भैरवनाथ शिंदे,** वय 20, खोणीगांव, मिठपाडा

सदरच्या टोळीने कल्याण व भिवंडी या परिसरातील दुचाकी वाहने मोठया प्रमाणावर चोरलेली आहेत. सदरची टोळी ही रात्रीच्या वेळी बाहेर पडुन गल्लीबोळयात पार्कीग केलेल्या मोटर सायकली हेरुन नंतर इग्नीशन लॉकची वायर तोडुन चोरुन नेण्याची त्यांची पध्दत आहे. आतापर्यंत या टोळीकडुन **एकुण 13,50,000/- रु** किंमतीची **21 वाहने** जप्त करण्यात यश मिळालेले आहे. यामध्ये 10 हिरो होंडा पॅशन, 1 हिरो होंडा स्प्लेन्डर, 1 होंडा युनिकॉन, 1 होंडा करिश्मा, 5 बजाज पल्सर, 1 बजाज पल्सर, 1 बजाज डिस्कव्हर, 1 बजाज सिटी 100 यांचा समावेश आहे. या टोळीकडुन आतापर्यंत पोलीस ठाणे नारपोली, शांतीनगर, बाजारपेठ, महात्मा फुले चौक, निजामपुरा, भिवंडी तालुका या पोलीस ठाण्यांचे **एकुण 11 गुन्हे उघडकीस आलेले आहेत.**

**घटक क्र. 1, गुन्हे शाखा ठाणे :--**

ठाणे शहरात घडलेले घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरिता गुन्हे शाखा घटक क्र. 1, ठाणे यांनी विशेष लक्ष दिलेले होते. **वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.चंद्रकांत जोशी, घटक क्र.1, गुन्हे शाखा, ठाणे** यांना मिळालेल्या माहितीनुसार **लड्डु उर्फ नुरमहम्मद अब्दुलकरीम शेख,** वय 35, रा. स्टार बिल्डींग, 2 रा माळा, रशिद कंपौड, कौसा, मुंब्रा, ठाणे व त्याच्या 3 साथीदारांना चौकशीकामी ताब्यात घेण्यात आलेले होते. त्यांच्याकडे केलेल्या सखोल चौकशी वरुन त्याचा घरफोडीच्या गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना दिनांक 5/07/2009 रोजी नौपाडा पोलीस ठाणे, गु.र नं. 273/09 या गुन्हयात अटक करण्यात आली. सदर आरोपींची नावे खालीलप्रमाणे

(1) **लड्डु उर्फ नुरमहम्मद अब्दुलकरीम शेख,** वय 35, रा. स्टार बिल्डींग, 2 रा माळा, रशिद कंपौड, कौसा, मुंब्रा
(2) **सितल उर्फ जावेद नानू शेख,** वय 24, रा. मुंब्रा शिळफाटा, शिळगाव, घर नं. 3, गंगाराम शेठची चाळ, ठाणे
(3) **शब्बीर हारुण शेख,** वय 26, रा. मुंब्रा, कौसा, रशिद कंपौड, स्मशानघाटचे समोरील चाळ, पहिला माळा, खोली नं. 12, ठाणे
(4) **महेश आंनद हेगडे,** वय 26, रा. मुंब्रा, शिळफाटा, शिळगाव, बळीराम शेठची चाळ, खोली नं. 3, ठाणे

वरील घरफोडी करणा--या टोळीकडुन आतापर्यंत **ठाणे व मुंबई परिसरातील 14 घरफोडीचे गुन्हे** आणण्यास यश मिळालेले आहे. सदर गुन्हयात **एकुण 3, 51, 950 रु किंमतीचा मुद्देमाल जप्त** करण्यात आलेला आहे. या टोळीकडुन पोलीस ठाणे नौपाडा -- 2, मुंब्रा -- 2, राबोडी -- 1, विक्रोळी -- 1 दादर -- 1, घाटकोपर -- 1, मालाड -- 1, ऑन्टॉप हिल -- 1, पायधुनी -- 2, माटुंगा -- 1, यलोगेट -- 1 असे चोरीचे, जबरी चोरीचे व घरफोडीचे गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

---xox---